# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ०५-२३ दिनांक ०५/०१/२०२३

## दोन महिन्याच्या लहान बालकाची विक्री करणा-या टोळीस गजाआड करण्यास गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांना यश.

दिनांक २७/१२/२०२२ रोजी ११.०० वा. सुमारास महिला फिर्यादी वय २३ वर्षे यांच्या गरीब परिस्थितीचा फायदा घेवून समर्थ कृपा अपार्टमेंट समोर रस्त्यावर, वीर सावरकर मार्ग, विरार (पू) येथे इसम नामे कृष्णा (पूर्ण नाव माहित नाही), महिला नामे मावशी (पूर्ण नाव माहित नाही) तसेच ३ अनोळखी पुरूष इसम व २ अनोळखी महिला यांनी आपआपसात संगनमत करून यांनी फिर्यादी यांना आश्वासन दिले की त्यांचा दोन महीन्याचा मुलगा अमिन याचा सांभाळ ते करतील तसेच सदर महिलेस तिच्या मुलास कधीही भेटावयाचे असल्यास ते भेट घडवून देतील असे आश्वासन देवून फिर्यादी यांच्या ताब्यातून त्यांच्या दोन महिन्याच्या मुलास ताब्यात घेतले व त्याची परस्पर विक्री केली होती. सदर घटनेबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर १४/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३७०(१), ३४ सह बाल न्याय अधिनियम २०१५ कलम ८१ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हा गंभीर स्वरुपाचा असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्ष्यात घेवून वरिष्ठांनी नमूद गुन्हयातील अपहरीत मुलाचा शोध घेवून जलद गतीने गुन्हा उघडकीस आणण्याकरीता गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार यांना सूचना दिल्या होत्या. त्याअनुषंगाने गुन्हे शाखा, कक्ष ३ विरार येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची तीन स्वतःत्र पथके तयार करण्यात आली होती. सदर पोलीस पथकांनी तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) बाळकृष्णा ऊर्फ कृष्णा भिकाजी कांबळे, वय ३२ वर्षे, रा. विरार पुर्व यास सफाळे, जि. पालघर येथुन तसेच २) गोविंद रामजी परमार, वय ७१ वर्षे रा. भाईंदर पुर्व यास भाईंदर येथुन ३) मुकेश प्रभुलाल दहीया, वय ४८ वर्षे, रा. जि. वलसाड, राज्य गुजरात. ४) भुषण हरखीत सिंग, वय ४६ वर्षे, रा. जि. वलसाड, राज्य गुजरात यांना वलसाड राज्य गुजरात येथुन दिनांक ०४/०१/२०२३ रोजी ताब्यात घेतले. आरोपीत भुषण सिंग याचेकडुन अपहरीत मुलगा अमिन यास ताब्यात घेवून त्याच्या पालकांचे सुखरुप ताब्यात दिले. त्याचप्रमाणे नमूद आरोपीतांना पुढील कारवाई करीता विरार पोलीस ठाणे येथे हजर करुन सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, सचिन घेरे, शंकर शिंदे, मुकेश तटकरे, सागर बारावकर, अश्विन पाटील, पो.अं. राकेश पवार, सुमित जाधव, सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष ३ यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.



--------------ooooo--------------